# १२ वर्षे जमा-खर्चाच्या पोकळ बाता

## पंतप्रधान मोदींचे आवाहन आर्थिक गैरव्यवस्थापनाचे घोतक

**निहार रंजन सक्सेना। नवराष्ट्र दिल्ली.** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना इंधनाचा वापर कमी करा, कारपूलिंग करा, सार्वजनिक वाहतुकीचा वापर करा, घरून काम करा, खाद्यतेलाचा वापर कमी करा आणि वर्षभरासाठी अनावश्यक परदेश प्रवास मर्यादित ठेवण्याचे आवाहन केले आहे. सरकारने त्यांच्या आवाहनाला आखाती संकटामुळे तणावाशी जोडले आहे, त्यामुळे तेल पुरवठ्यात व्यत्यय येऊ शकतो आणि आयातीचा खर्च वाढू शकतो. टीकाकारांचे म्हणणे आहे की, सरकारी संसाधनांचा बेफिकीरपणे वापर करून राजकीय सत्ता मिळवली जाते, तेव्हाच आर्थिक गैरव्यवस्थापनाचा भार जनतेवर टाकला जातो. पंतप्रधान व इतर केंद्रीय मंत्र्यांच्या भाषणांनंतर लगेचच एसयूव्ही गाड्यांच्या ताफ्यासह रोडशो आयोजित केले. ज्यांचा उद्देश पक्षीय-राजकीय संदेश देणे. त्यावेळी सामान्य नागरिकांना त्यांच्या मूलभूत गरजा कमी करण्याचे आवाहन करणे हा होता.





### कमकुवतपणाची चिन्हे आधीच अस्तित्वात

इराणवरील अमेरिका-इस्त्रायल हल्ल्याच्या खूप आधीपासूनचे भारताचे आर्थिक निर्देशक, देशातील खोलवर रुजलेल्या संरचनात्मक कमकुवतपणाचे दर्शन घडवतात, त्यामुळे देश या बिकट परिस्थितीत सापडला आहे. भारताच्या आयात केलेल्या कच्च्या तेलावरील अवलंबित्व २०१४ मधील अंदाजे ७७.६% वरून २०२६ पर्यंत ८८.६% पेक्षा अधिक झाले आहे. देशांतर्गत कच्च्या तेलाचे आणि वायूचे उत्पादन सलग अनेक वर्षे घटले आहे, तर इंधन आणि शुद्ध केलेल्या उत्पादनांची मागणी वाढली आहे. मोदी सरकारने भारताचे सामरिक पेट्रोलियम साठे केवळ अंशतःच भरले होते. ५.३३ दशलक्ष टन क्षमतेपैकी त्यात अंदाजे ३.३७ दशलक्ष टन तेल होते, म्हणजेच सुमारे ६४% पुरवठ्यात व्यत्यय आल्यास हा साठा केवळ १० दिवसांचा पुरवठा करण्यासाठी पुरेसा आहे.

### भारत शुद्ध तेलाची निर्यात खालील देशांना करतो

(संबंधित देशाची अब्ज डॉलर्समधील निर्यात व एकूण निर्यातीमधील वाटा.)




### आशियातील सर्वात कमकुवत रुपया

- गेल्या वर्षभरात रुपया हे आशियातील सर्वात खराब कामगिरी करणारे चलन ठरले आहे. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत त्याचे मोठे अवमूल्यन झाले आहे.
- २०२४ च्या अखेरीस रुपया ८५-८६ च्या आसपास व्यवहार करत होता आणि २०२५ च्या अखेरीस ९० च्या जवळपास किंवा त्याहून अधिक पोहोचला.
- त्यानंतर मे २०२६ मध्ये तो ९४-९५ च्या आसपास स्थिरावला. ही १०% पेक्षा अधिक अलीकडील घसरण आणि २०१४ मधील सुमारे ६० पासूनची दीर्घकालीन घसरण दर्शवते. ही रुपयाची २०१० च्या दशकाच्या सुरुवातीपासूनची सर्वात वाईट वार्षिक कामगिरी आहे.
- ती पश्चिम आशियाशी संबंधित एका तात्पुरत्या धक्क्याऐवजी, सतत होणारा परकीय भांडवलाचा बहिर्वाह, कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमती आणि मजबूत डॉलर यांच्या एकत्रित परिणामाचे प्रतिबिंब आहे.

### व्यापार तूट वाढली

व्यापार तूट देखील लक्षणीयरीत्या वाढली आहे. भारताने २०२४-२५ मध्ये वस्तूंच्या व्यापारात अंदाजे २८२.८ अब्ज डॉलर्सची तूट नोंदवली, जी २०२३-२४ मध्ये २४१.१ अब्ज डॉलर्स होती. वस्तू आणि सेवांसह एकूण व्यापार तूट २०२५-२६ मध्ये आणखी वाढली, कारण निर्यातीपेक्षा आयात अधिक वेगाने वाढली. हे निर्देशक मोदींच्या राजवटीतील संचित आर्थिक गैरव्यवस्थापनाकडे निर्देश करतात. कमकुवत चलन, वाढती तूट, कमी राखीव निधी आणि रोजगारातील असमान वाढीमुळे धोरणात्मक वाव कमी झाला आहे, राजकीय उत्तरदायित्व टाळले जात आहे. आधीच महागाईने त्रस्त असलेल्या भारतीयांवर भार टाकला जात आहे.

---

चिंतेचे वातावरण ; शेअर बाजारात चढ-उतार

# बाजारातील घसरणीमुळे गुंतवणूकदार धास्तावले

**३८,४४०** कोटी रुपये झाले




**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** पश्चिम आशियातील तणाव, कच्च्या तेलाच्या किमतीतील चढउतार आणि जागतिक आर्थिक वाढीबद्दलच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर, इक्विटी म्युच्युअल फंड योजनांमध्ये एप्रिल महिन्यात ३८,४४० कोटी रुपयांचा नेट इनफ्लो आला, जो मार्चच्या तुलनेत जवळपास ५ टक्क्यांनी कमी आहे, अशी माहिती उद्योग संघटना एएमएफआयने सोमवारी दिली. असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्‌ इन इंडियाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, एसआयपीद्वारे होणारे मासिक योगदान देखील मार्चमधील ३२,०८७ कोटी रुपयांच्या तुलनेत एप्रिलमध्ये ३१,११५ कोटी रुपयांपर्यंत घसरले. संपूर्ण म्युच्युअल फंड उद्योगात एप्रिलमध्ये ३.२२ लाख कोटी रुपयांचा ओघ दिसून आला. तर मार्चमध्ये २.४ लाख कोटी रुपयांचा आउटफ्लो झाला होता. एप्रिलमधील ही वाढ प्रामुख्याने डेट-ओरिएंटेड फंडांमध्ये झालेल्या २.५ लाख कोटी रुपयांच्या ओघामुळे झाली. या गुंतवणुकीच्या ओघामुळे मार्च अखेरीस असलेल्या ७३.७३ लाख कोटींवरून एप्रिल अखेरीस उद्योगाची एकूण व्यवस्थापनाखालील मालमत्ता ११ टक्क्यांनी वाढून ८१.९२ लाख कोटी झाली. एएमएफआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी व्यंकट चालसानी म्हणाले की, ही वाढ विविध श्रेणींमधील मजबूत सकारात्मक गुंतवणुकीचा ओघ आणि महिन्याभरात बाजार मूल्यांकनात झालेल्या सुधारणेचा परिणाम आहे. मॉर्निंगस्टार इन्व्हेस्टमेंट रिसर्च इंडियाचे संशोधन व्यवस्थापक हिमांशू श्रीवास्तव म्हणाले की, जागतिक अनिश्चितता आणि शेअर बाजारातील नियतकालिक चढ-उतार अजूनही सुरू आहे.

### अनेक ठिकाणी गुंतवणूक

- इक्विटी फंड योजनांमधील गुंतवणूक मार्चमधील ४०,४५० कोटींवरून एप्रिलमध्ये ३८,४४० कोटींपर्यंत घसरली. तथापि, ही रक्कम फेब्रुवारीमधील २५,९७८ कोटींपेक्षा अधिक आहे.
- या श्रेणीतील निव्वळ गुंतवणूक ओघ सकारात्मक राहण्याचा हा सलग ६२ वा महिना आहे. बहुतांश प्रकारांमधील गुंतवणूक सकारात्मक राहिली असली तरी, नफावसुली (प्रॉफिट बुकिंग) आणि पोर्टफोलिओ पुनर्संतुलनामुळे लाभांश देणाऱ्या (डिव्हिडंड यील्डिंग) आणि इक्विटी-लिंक्ड सेव्हिंग्ज स्कीम फंडांमधून निधी बाहेर गेला.
- इक्विटी सेगमेंटमध्ये, फ्लेक्सी-कॅप फंडांमध्ये सर्वाधिक १०,१४८ कोटींचा ओघ (इनफ्लो) दिसून आला, त्याखालोखाल स्मॉल-कॅप फंडांमध्ये ६,८८६ कोटी आणि मिड-कॅप फंडांमध्ये ६,५५१ कोटींचा ओघ होता.
- लार्ज-कॅप फंडांमध्ये २,५२५ कोटींचा निव्वळ ओघ (नेट इनफ्लो) दिसून आला. याव्यतिरिक्त, सोन्यावर आधारित गोल्ड ईटीएफमध्ये एप्रिलमध्ये ३,०४० कोटींचा ओघ दिसून आला, जो मार्चमधील २,२६६ कोटींपेक्षा अधिक आहे.

### हायब्रीड योजनांमध्ये २०,५६५.२४ कोटींचा ओघ नोंदवला

| श्रेणी | मार्च २०२६ | एप्रिल २०२६ | निव्वळ बदल |
|---|---|---|---|
| इक्विटी एमएफ | ४०,४५० कोटींचा ओघ | ३८,४४० कोटींचा ओघ | जवळपास ५% घट |
| डेट एमएफ | २.९५ लाख कोटींचा बहिर्वाह | २.४७ लाख कोटींचा ओघ | जोरदार सुधारणा |
| हायब्रीड फंड | १६,५३८ कोटींचा बहिर्वाह | २०,५६५ कोटींचा ओघ | जोरदार पुनरागमन |
| गोल्ड ईटीएफ | २,२६६ कोटींचा ओघ | ३,०४० कोटींचा ओघ | वाढलेली गुंतवणूक |
| इतर योजना | ३०,७६८ कोटींचा ओघ | २०,०८२ कोटींचा ओघ | घटलेला ओघ |
| एकूण एमएफ उद्योग | २.४० लाख कोटींचा बहिर्वाह | ३.२२ लाख कोटींचा ओघ | मोठी सुधारणा |

---

### शेअर

बीएसई । ७६,०१५.२८ (▼१३१२.९१)

निफ्टी । २३,८१५.८५ (▼३६०.३०)

सोने चांदी — सोने स्टँडर्ड (10 ग्रॅम): नागपूर १,५२,४००(▲) मुंबई १,५२,२००(▲)

चांदी (प्रतिकिग्रॅ): नागपूर २,६७,४००(▲) मुंबई २,६६,०००(▲)

₹/डॉलर (प्रति डॉलर) ९५.३१

कच्चे तेल (प्रति बॅरल) १०३.५

## Short News

### ६.६% राहणार जीडीपीचा वेग

**दिल्ली.** एसबीआय रिसर्चच्या एका अहवालानुसार, २०२६-२७ या आर्थिक वर्षात भारताची अर्थव्यवस्था ६.६ टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे, तर कमकुवत होत असलेला रुपया आणि वाढत्या तेलाच्या किमतींच्या पार्श्वभूमीवर एका व्यापक ताळेबंद पॅकेजची गरज आहे. अहवालात म्हटले आहे की, अस्पष्ट बाह्य आर्थिक परिस्थिती आणि सततच्या सट्टेबाजीमुळे अलीकडेच कमकुवत झालेल्या रुपयाला ताळेबंद आघाडीवर संरचनात्मक बदलांची आवश्यकता आहे. यासाठी आयात प्रतिस्थापन, निर्यात स्पर्धात्मकता आणि जागतिक पुरवठा साखळीत एकीकरणासारख्या सुरक्षा उपायांना सुव्यवस्थित करणे आवश्यक आहे. रुपयाने अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ९५ चा स्तर ओलांडला आहे. पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या जागतिक अनिश्चिततेमुळे अमेरिकन डॉलर मजबूत झाला.

# खते साठवून ठेवू नका

## खरीप पेरणी हंगामासाठी खतांचा साठा पुरेसा



**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** केंद्र सरकारने सोमवारी सांगितले की, देशाकडे खतांचा पुरेसा साठा आहे. शेतकऱ्यांनी घाबरून खरेदी करू नये, असे आवाहन केले आहे. पश्चिम आशियातील अलीकडील घडामोडींवर झालेल्या आंतर-मंत्रालयीन बैठकीत खत विभागाच्या अतिरिक्त सचिव अपर्णा एस. शर्मा यांनी सांगितले की, देशांतर्गत उत्पादनाला पूरक म्हणून आणि आगामी खरीप हंगामात पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी सरकार युरिया आणि इतर खतांची आयात करत आहे. प्रमुख खतांच्या कमाल किरकोळ किमती (एमआरपी) स्थिर आहेत. शर्मा यांनी यावर जोर दिला की, केंद्र आणि राज्य सरकारे खतांच्या संतुलित वापराला प्रोत्साहन देण्यासाठी आणि अतिवापर रोखण्यासाठी प्रयत्न करित आहे. राज्य सरकारे साठेबाजीला आळा घालण्यासाठी आणि खतांच्या घटकांचा व्यावसायिक वापरासाठी होणारा गैरवापर रोखण्यासाठी कारवाई करत आहेत. भारताची खत सुरक्षा समाधानकारक आणि सुसंघटित आहे. शर्मा यांनी सांगितले की, खत विभागाच्या अहवालानुसार कृषी विभागाने अंदाजित केलेल्या गरजेच्या ५१ टक्क्यांहून अधिक साठा खरीप २०२६ साठी उपलब्ध आहे. त्यांनी स्पष्ट केले की, हा साठा सामान्य पातळीपेक्षा (सुमारे ३३ टक्के) लक्षणीयरीत्या अधिक आहे. कृषी विभागाने खरीप २०२६ साठी एकूण खतांची गरज ३९०.५४ लाख टन असल्याचा अंदाज वर्तविला आहे. खतांचा साठा पुरेसा असून, प्रमुख खतांच्या कमाल किरकोळ किमतीत कुठलाही बदल झालेला नाही. संकटकाळानंतर देशांतर्गत उत्पादन ७६.७८ लाख टन झाले. आयात १९.९४ लाख टन झाली आहे. त्यामुळे खतांची एकूण उपलब्धता ९७ लाख टनांपर्यंत वाढली आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

### मागणीच्या काळात पुरेशी उपलब्धता सुनिश्चित

याव्यतिरिक्त, देशासाठी १२ लाख टन डीएपी (डाय-अमोनियम फॉस्फेट), ४,००,००० टन ट्रिपल सुपर फॉस्फेट आणि ३,००,००० टन अमोनियम सल्फेट देखील मिळवण्यात आले आहे. त्यामुळे पुढील १५-२० दिवसांत सुरू होणाऱ्या सर्वाधिक मागणीच्या काळात पुरेशी उपलब्धता सुनिश्चित होईल. त्यांनी सांगितले की, सचिवांचा एक अधिकारप्राप्त गट साप्ताहिक आधारावर परिस्थितीचा आढावा घेत आहे. खत विभागाने गेल्या आठवड्यात अहवाल दिला की, मार्च-एप्रिल दरम्यान देशांतर्गत उत्पादन ६.७७६ दशलक्ष टन होते. यामध्ये युरिया (४.०७२ दशलक्ष टन), डीएपी (५.३९ दशलक्ष टन), एनपीके (१.३६५ दशलक्ष टन) आणि एसएसपी (८००,००० टन) यांचा समावेश आहे.

संभाजीनगरात नवा प्रकल्प; २०२९मध्ये उत्पादन

# टोयोटा-किर्लोस्कर देणार राज्यात २,८०० रोजगार

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** टोयोटा-किर्लोस्कर मोटर संभाजीनगरच्या शेंद्रा-बिडकीन औद्योगिक वसाहतीत नवा उत्पादन प्रकल्प उभारणार असून, २०२९च्या पहिल्या सहामाहीत तेथे नवीन एसयूव्हीचे उत्पादन सुरू होणार आहे. वर्षाकाठी १ लाख गाड्यांच्या उत्पादनाचे लक्ष्य असून, यातून २,८०० तरुणांना रोजगार मिळणार आहे.

कंपनीने प्रकल्पाच्या गुंतवणुकीची नेमकी रक्कम जाहीर केली नसली तरी जपानी माध्यमांमधील वृत्तांनुसार, मूळ कंपनी 'टोयोटा मोटर्स'ने भारतात उत्पादन वाढवण्यासाठी महाराष्ट्रात ३०० अब्ज येन (सुमारे १.९ अब्ज अमेरिकी डॉलर्स) गुंतवणुकीची योजना आखली आहे. वाहन निर्मितीचा हा नवा प्रकल्प 'शेंद्रा-बिडकीन पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात उभारला जाईल. २०२९ मध्ये प्रकल्पात उत्पादन सुरू करणे हे उद्दिष्ट आहे.




### वार्षिक १ लाख एसयूव्ही निर्मिती

संभाजीनगरच्या या प्रकल्पातून एका नवीन 'एसयूव्ही' मॉडेलचे वर्षाकाठी १ लाख गाड्यांचे उत्पादन केले जाईल. प्रकल्पातील कामकाजात स्टॅम्पिंग, वेल्डिंग, पेंटिंग आणि असेंब्लीसारख्या प्रमुख प्रक्रियांचा समावेश असेल. कंपनीचे सध्या कर्नाटकात २ उत्पादन प्रकल्प कार्यरत असून, त्यांची एकत्रित वार्षिक उत्पादन क्षमता ५ लाख ५२ हजार वाहनांची आहे.

# कोळसा लिलावात ६% घट



**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** देशातील सर्वात मोठी कोळसा उत्पादक कंपनी, कोल इंडिया लिमिटेडने (सीआयएल) एप्रिलमध्ये ऑनलाइन लिलावाद्वारे ३०.५ दशलक्ष टन (एमटी) कोळसा विक्रीसाठी उपलब्ध केला. मार्चमध्ये विक्रीसाठी उपलब्ध केलेल्या ३२.५ दशलक्ष टनच्या तुलनेत ही सहा टक्क्यांची घट आहे. पश्चिम आशियातील सुरू असलेल्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर ही घट झाली आहे, त्यामुळे जागतिक ऊर्जा दरात वाढ झाली.

# २ दिग्गजांची खुर्ची धोक्यात

## टाटा ट्रस्टसमध्ये दिसतोय 'नोएल इफेक्ट'




**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** टाटा समूहाचा शक्तिशाली आधारस्तंभ असलेल्या टाटा ट्रस्टसमध्ये मोठ्या अंतर्गत मतभेदाचे वृत्त समोर येत आहे. टाटा ट्रस्ट्सचे अध्यक्ष नोएल टाटा यांनी टीव्हीएस मोटरचे चेअरमन एमेरिटस वेणू श्रीनिवासन आणि माजी सनदी अधिकारी विजय सिंह यांची टाटा एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट ट्रस्टमध्ये पुनर्नियुक्ती करण्याच्या प्रस्तावाविरोधात मतदान केले. विश्वस्तांच्या पुनर्नियुक्तीसाठी एकमताने संमती अनिवार्य आहे. नोएल टाटा यांच्या नेतृत्वाखालील ३ विश्वस्तांच्या विरोधानंतर, या २ दिग्गजांना मंडळातून काढून टाकणे आता निश्चित मानले जात आहे. टाटा ट्रस्ट्सची सूत्रे हाती घेतल्यापासून नोएल टाटा यांनी समूहातील अशा ज्येष्ठ सदस्यांविरुद्ध उघडपणे भूमिका घेण्याची पहिलीच वेळ आहे. वेणू श्रीनिवासन व विजय सिंह हे रतन टाटा यांचे विश्वासू सहकारी आहेत.

### स्टेट बँकेत ४ हजार नोकऱ्या

**दिल्ली.** भारतातील मोठी सार्वजनिक क्षेत्रातील बँक, एसबीआय, एक मजबूत वसुली पथक तयार करण्यासाठी पुढील वर्षापर्यंत ४,००० कर्मचाऱ्यांची भरती करण्याची योजना आखत आहे. आपल्या वाढत्या कर्ज पोर्टफोलिओच्या पार्श्वभूमीवर मालमत्तेची गुणवत्ता जपण्यासाठी एसबीआय हे पाऊल उचलत आहे. वृत्तानुसार, बँकेच्या चौथ्या तिमाहीच्या निकालानंतर एसबीआयचे चेअरमन सी. एस. शेट्टी म्हणाले, एसबीआयसारखी मालमत्तेची गुणवत्ता कुणाकडेही नाही.

**पश्चिम रेल्वे - रतलाम विभाग**

**ई-निविदा सूचना**

**निविदा क्र. SNT_RTM_W_EPC_26_01 दिनांक: 08/05/2026. प्रकल्पाचे नाव:** पश्चिम रेल्वेच्या रतलाम विभागातील नागदा-उज्जैन-ताजपूर, फांदा-संत हिरदाराम नगर, उज्जैन-करछा आणि मंगळियागाव-इंदूर दरम्यानच्या दुहेरी मार्गावरील (RE) स्थानकांवर 4-ॲस्पेक्ट ऑटोमॅटिक ब्लॉक सिग्नलिंग (EI सह), ड्युअल मल्टी-सेक्शन डिजिटल ॲक्सल काउंटर्स, ऑटो हट आणि इतर संबंधित कामांचे सर्वेक्षण, डिझाइन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वयन, तसेच योग्य सुधारणांसह काम. **लांबी (TKM):** 115.46 RKMs. **अंदाजित प्रकल्प खर्च:** 127.72 कोटी. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** 18 महिने. निविदा दस्तऐवज रेल्वेच्या अधिकृत पोर्टलवर **(https://www.ireps.gov.in/)** 08.05.2026 ते 19.06.2026 (भारतीय प्रमाणवेळेनुसार 15:00 वाजेपर्यंत) पाहता/डाउनलोड करता येईल. निविदाकारांनी त्यांच्या आर्थिक आणि तांत्रिक निविदा भारतीय प्रमाणवेळेनुसार 15:00 वाजेपर्यंत **(https://www.ireps.gov.in/)** सादर करणे आवश्यक आहे. ऑनलाइन प्राप्त झालेल्या निविदा 24.06.2026 रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार 15:30 वाजता उघडल्या जातील. इतर कोणत्याही माध्यमातून सादर केलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. तथापि, मुखत्यारपत्र आणि संयुक्त निविदा करार इत्यादी निविदाकाराद्वारे 24.06.2026 रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार 15:00 वाजेपर्यंत प्रत्यक्ष सादर केले जाऊ शकतात. कृपया नोंद घ्यावी की, मुख्य सिग्नल आणि दूरसंचार अभियंता, डब्ल्यू-1, चर्चगेट, WR, कोणतेही कारण न देता सर्व किंवा कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवतात. CRY/IND/47

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा: x.com/WesternRly

**मध्य रेल्वे**

**शुद्धिपत्रक**

**ई-निविदा संख्या** GeM/2026/B/7515337 दिनांक: 07.05.2026

या वृत्तपत्रात 9 मे 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यात "बुटीबोरी आणि अजनी आणि बैतुल गुड्स शेड मध्ये 1 वर्षासाठी" च्या ऐवजी "बडनेरा, अजंती गुड्स शेड क्र.1 मध्ये" असे चुकीचे छापले गेलेले आहे.

**स. वा. प्र. (माल)/नागपुर**

अनधिकृतपणे रेल्वे रूळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे. 208

**NATIONAL AGRICULTURAL COOPERATIVE MARKETING FEDERATION OF INDIA LTD**

Naman centre,'A'Wing,Unit No.803, 8th Floor, C-31, G-Block, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai-51
Tel:022-26531732 Email:-nafmbi@nafed-india.com

NAFED invites Expression of interest (EOI )No 02 Dated: 11-05-2026 for selection of agency for providing end-to-end facilitation including Project Management Consultancy (PMC) services for identification of PACs, Preparation of DPRs, Financial Tie-up, Development of godown infrastructure, hand-holding and all associated services to PACs/ Society, etc under the world's largest grain storage scheme of the Ministry of Cooperation, GOI. The last date of submission of quotation is 18.05.2026. Interested bidders may visit our website: www.nafed-india.com or contact State Head, Mumbai, NAFED at above address.

STATE HEAD
NAFEDMUMBAI

**MAHAVITARAN** Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**Short Tender Notice**

**(Reference No. NZ/PR No.83 Dt.11.05.2026)**

The Executive Engineer, MSEDCL, Mahal Division invites e-Tender in two bid system from register & experienced reputed Agency/Contractor having experience of similar nature of work in MSEDCL & completing the formalities for the work of sweeping and cleaning at various 33 KV and 11 KV Switching Sub-Stations, Section Office, Subdivisions Offices under Mahal Division including Mahal Division office Nagpur., Tender No: - **EE/Mahal/Dn./Tech/Sweeping Cleaning/25-26/eT-01**. The Tender fees & other details are available on website **etender.mahadiscom.in/eat.App.//**. The Tender documents can be downloaded from aforesaid website from 11.05.2026. Submit the tender duly filled in on or before 18.05.2026 before 16.00 Hrs. Any changes in tender schedule, corrigendum, amendment, extension of due dates etc. if any shall be available on our website only & will not be published in newspaper separately.

**Executive Engineer**
**O&M, MSEDCL, Mahal Division, Nagpur.**

महाराष्ट्र शासन

**कार्यालय कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर**

ई-मेल पत्ता :- achalpur.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी / फॅक्स क्रमांक :- 07223 220260

**ई - निविदा सुचना क्रमांक-05/निली/2026-27/दि. 07/05/2026**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर दूरध्वनी क्रमांक. 07223 220260 हे राज्यपाल, महाराष्ट्र शासन हयांच्या वतीने खालील कामांचे ब-1 नमुन्यातील ऑनलाईन निविदा सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मजुर सहकारी संस्थाकडून मागवित आहे. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावरhttps://mahatenders.gov.inयेथुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपुर यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किमत |
|---|---|---|
| | फक्त अमरावती जिल्हयातील मजुर सहकारी संस्थाकरीता | |
| 1 | सा.बा.विश्रामगृह, विश्रामभवन, चिखलदरा येथे बाहयस्त्रोताव्दारे येथील बाहयस्त्रोत मजुरांकडून साफसफाई करून घेणे. | 3856309.00 |
| 2 | मौजे टिंग-या ता.धारणी जि.अमरावती येथे अंतर्गत सिमेंट काँक्रिट रस्ता व नाली बांधकाम करणे | 1216521.00 |
| 3 | मौजे कुसुमकोट खुर्द ता.धारणी जि.अमरावती येथे अंतर्गत सिमेंट काँक्रिट रस्ता बांधकाम करणे | 1216237.00 |
| 4 | मौजे गोंडवाडी ता.धारणी जि.अमरावती येथे अंतर्गत सिमेंट काँक्रिट रस्ता व नाली बांधकाम करणे | 1216298.00 |
| 5 | मौजे तळेगांव मोहना ता.चांदुर बाजार जि.अमरावती येथे ग्रा.पं.चे खुल्या जागेवर श्री.गुरूदेव सेवा मंडळ जवळ सभागृह बांधकाम करणे. | 1259394.00 |
| 6 | मोजे जसापूर ता.चांदुर बाजार जि.अमरावती येथे श्रीकृष्ण मंदिर ते निंभोरा मुख्य रस्ता पर्यंत सिमेंट काँक्रिट रस्ता बांधकाम करणे. | 1269948.00 |
| 7 | मौजे देऊरवाडा ता.चांदुर बाजार जि.अमरावती येथे सार्वजनिक वाचनालय बांधकाम करणे, | 1262224.00 |
| 8 | न.प. अचलपूर क्षेत्रातील परतवाडा येथील वाघामाता चौक ते खिरणी बगीचा पासुन रोड पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | 4813976.00 |
| 9 | न.प. अचलपूर क्षेत्रातील परतवाडा येथे श्री.कृष्णा उघडे ते ओपन स्पेस पर्यंत नाली बांधकाम करणे तायडे यांच्या घरापासून ते महल्ले यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | 4006916.00 |
| 10 | न.प.अचलपूर क्षेत्रातील बुंदेलपूरा/माळवेशपूरा नागोबा मंदिर (श्रीराम मंदिर समोर) श्री. देशमूख वाडा ते शेवाळकर मंगल कार्यालय ते तोंडगाव गेट पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे, | 2403862.00 |
| 11 | न.प. अचलपूर क्षेत्रातील हनवतपुरा/रायपुरा रेल्वे गेट पासुन ते स्मशानभुमी पर्यंत सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे. | 1603840.00 |
| 12 | न.प. अचलपूर क्षेत्रातील जीवन पुरा मुख्य रस्त्यापर्यंत ते भैरव घाट स्मशान भूमीपर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | 3209743.00 |
| 13 | न.प.अचलपूर क्षेत्रातील हत्ती मंदिर ते सुदर्शन नगर पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | 4002443,00 |
| 14 | न.प. अचलपूर क्षेत्रातील सुल्तानपुरा येथील लाल मारोती मंदिर येथे सौंदर्यीकरणासह पेव्हिंग ब्लॉक शौचालय बांधकाम करणे. | 1598992.00 |
| 15 | न.प. अचलपूर क्षेत्रातील अंतर्गत भगतसिंग चौकातील हनुमान व्यायाम शाळा येथे नगर परिषदचे सभागृह बांधकाम करणे. | 4010139.00 |
| 16 | न.प. अचलपूर क्षेत्रातील अंतर्गत परतवाडा येथील पाशीनाथ दिगंबर जैन मंदिर येथे नगर परिषदेचे सभागृह बांधणे. | 2404851.00 |
| 17 | न.प. अचलपूर क्षेत्रातील अंतर्गत सुलतानपुरा येथे श्री. स्वामी समर्थ महाराज मंदिर येथे नगर परिषदेचे सामाजिक सभागृहाचे बांधकाम करणे. | 2801276.00 |
| 18 | न.प.अचलपूर क्षेत्रातील अंतर्गत अब्बासपुरा प्रभूदादा मंदिरा जवळील कालंका माता मंदिर (गंगा देवी) येथे नगर परिषदेचे सामाजिक सभागृहाचे बांधकाम करणे. | 1206422.00 |
| 19 | न.प. चांदुर बाजार क्षेत्रातील अंतर्गत गाडगेबाबा चौकात सौदयीकरण करणे.. | 1200211.00 |
| 20 | न.प. चांदुर बाजार क्षेत्रातील अंतर्गत आठवडी बाजार मध्ये श्री.टर्डन ते भट्टड दुकानापर्यंत सिमेंट काँक्रिट रस्ता बांधकाम करणे, | 2009835.00 |
| 1 | निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि. 12/05/2026 @ 10.00 वाजता ते 19/05/2026 @ 17.00 वाजता |
| 2 | निविदा पुर्व बैठक स्थळ, दिनांक व वेळ | निरंक |
| 3 | निविदाकारांनी ऑनलाईन निविदा तयार करण्यासाठी व सादर करण्याचा (तांत्रिक व आर्थिक निविदा) अंतिम दिनांक व वेळ | दि. 12/05/2026 @ 10.00 वाजता ते 19/05/2026 @ 17.00 वाजता |
| 4 | तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर यांचे कार्यालयात दि. 21/05/2026 @10.00 ते @ 17.30 पर्यंत ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाचा सर्व माहिती उपलब्ध आहे.
1) **http://mahapwd.gov.in** 2) **https://mahatenders.gov.in** (सदर निविदे सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.) 3) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर कार्यालयातील सूचना फलक

**जावक क्रमांक :- /निली/2026.2027/दि 07/05/2026**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर**

**(प्रमोद बा. वानखडे)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर**

DGIPR/2026-27/C 711

**बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda**

**शाखा - नरेंद्र नगर**

**52, सुयोग नगर, तुकाराम सभागृह समोर, नरेंद्र नगर शाखा, रिंग रोड, नागपूर - 440015.**

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना** "परिशिष्ट-IV-A [नियम 6 (2) आणि 8 (6) ची तरतूद पहा]

**सिक्यूरिटी इंटरेस्ट (ईन्फोर्समेंट) रुल्स 2002 च्या नियम 6 (2) आणि 8 (6) च्या तरतुदीसह सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फाइनैंशियल अॅसेटस अॅन्ड ईन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट 2002 च्या अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: कर्जदार, गहाणदार आणि जामीनदारांना नोटीस दिली जाते की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/आकारणी केली आहे, ज्याचा ताबा कर्जदाराने घेतला आहे. बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी, सुरक्षित कर्जदार, खाली नमूद केलेल्या खात्यांतील थकबाकी वसूल करण्यासाठी **"जसे आहे तेथे", "जसे आहे तसे", आणि "जे काही आहे"** या आधारावर विकले जातील. कर्जदार/s/गहाणदार/जमीनदार/s/सुरक्षित मालमत्ता/s/देय/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली नमूद केले आहेत.

| अनु./ लॉट क्र. | कर्जदार/जमानतदार/ गहाणदार यांचे नाव आणि पत्ता | स्थावर मालमत्तेचे वर्णन (गहाणदार) | एकूण देय. | 1. राखीव किंमत 2. अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) 3. बिड वाढीव रक्कम | ई-लिलावाची तारीख ई लिलावाची वेळ - प्रारंभ वेळ ते समाप्ती वेळ | ताब्यात घेण्याची स्थिती (सांकेतिक/ वास्तविक) | मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ. | संपर्क व्यक्तीचे नाव व संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. तुळशीराम दौलत चौहान (कर्जदार / जमानतदार) | इक्वीटेबल गहाण असलेले जमिनीचा संपूर्ण भाग आणि तुकडा असलेले खुला प्लॉट नं. 405, खसरा नं. 23/1, 23/2, 24, 25/2, 26/1, 26/2, 26/3, 26/4 आणि 27, प.ह.नं. 40-ए, क्षेत्रफळ 847.66 चौ. फुट स्थित ज्यापैकी असलेले लेआऊट "मेलबर्न सिटी" नावानी परिचीत मौजा कालडोंगरीच्या हद्दित असलेले तहसिल नागपूर (ग्रामिण) आणि जिल्हा नागपूर. संपत्ती श्री. तुळशीराम दौलत चौहान यांच्या मालकीचे. **चतुःसिमा खालीलप्रमाणे : पुर्व** - प्लॉट नं. 416, **पश्चिम**- 9.00 मी. रुंद रोड, **उत्तर** - प्लॉट नं. 404, **दक्षिण** - प्लॉट नं. 406. (गहाणदार : श्री. तुळशीराम दौलत चौहान) | रु. 9,51,107.81 + लागु न झालेले व्याज आणि अन्य खर्च | रु. 8,02,000/- रु. 80,200/- रु. 10,000/- | 29/05/2026 रोजी 14:00:00 ते 18:00:00 वा. पर्यंत | वास्तविक | 26/05/2026 रोजी 10:00:00 ते 17:00:00 वा. पर्यंत | श्री. नरेश वंजारी 89897 71495 |

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया https://www.bankofbaroda.in/e-auction.htm आणि ऑनलाईन ऑक्शन पोर्टल https://baanknet.com या वेबसाइट लिंकला पहा/भेट द्या. तसेच, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक 8989771495 वर संपर्क साधू शकतात.

येथे स्कॅन करा तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी.

**दिनांक : 12/05/2026**
**स्थळ : नागपूर**

(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)

**अधिकृत अधिकारी बँक ऑफ बडोदा**